# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## दैनंदिन प्रेस नोट दि.२७/१२/१७
## दि.२६/१२/१७ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

### भाग-१ ते ५ चे गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | फरासखाना पो स्टे २९२/१७,भादविक ३९२,३४१,५०६,५०४,३४ |
| **फिर्यादी** | दत्तात्रय कोळी,वय-२५,रा.खेड,ता.आंबेगांव,जि.पुणे |
| **आरोपी** | १.राजन गोपाल नायर,वय-२८,रा.कोपरे रोड,उत्तमनगर,वारजे,पुणे २.राहुल गेटीराम साळुंखे,वय-२६,रा.उत्तमनगर,वारजे,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२७/०८/१७ रोजी २३/०० वा. दत्त मंदिर जवळील बंद दुकानाचे शटर जवळ सार्वजनिक रोडचे कडेला बुधवार पेठ,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे गणपती पाहण्यासाठी आले असताना,यातील नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचेजवळ येवुन,फिर्यादी यांना शिवीगाळ करून त्यांना धमकी देवुन,फिर्यादी यांचे खिशातील १० हजार रू किमतीचा मोबाईल जबरदस्तीने हिसकावुन चोरून नेला. (फिर्यादी व त्यांचे मित्र घाबरले असल्याने त्यांचा चोरून नेलेला मोबाईल निष्पन्न झाल्याने तसेच फिर्यादी व त्यांचे मित्रांनी सदर इसमांना पाहुन ओळखल्याने त्यांनी आज रोजी तक्रार दिली आहे.) |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. एम.पी.जाधव ९८२३२१२९०० |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बिबवेवाडी पो स्टे ३५६/१७,भादविक ३९४,३४१,३४ |
| **फिर्यादी** | ईस्माईल सैय्यद,वय-३५,रा.लिंबाळकर वस्ती,कात्रज,पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२६/१२/१७ रोजी १२/१५ वा. चंदन दुकानाचे समोर बिबवेवाडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे मित्रांसह मोटार सायकलवरून जात असताना,यातील नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांना दुचाकी आडवी लावुन,फिर्यादी यांचे डोक्यात फरशी मारुन त्यांना गंभीर जखमी करुन,फिर्यादी यांचे खिशातील ७,२००/- रु रोख रक्कम जबरदस्तीने काढुन चोरुन नेले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. जाधव ९७३०५१८४८३ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | अलंकार पो स्टे २२३/१७,भादविक ४५४,३८० |
| **फिर्यादी** | शरद लेले,वय- ६६ वर्ष,रा.एरंडवणा,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि. २६/१२/२०१७ रोजी दुपारी दुपारी ०१/४५ वा. ते ०४/१५ वा. चे दरम्यान फिर्यादी यांचे फलॅट नं.६,तिसरा माळा,अथर्व अपार्टमेंट,भरतकुंज सोसा.नं.१,लेन नं.३,एरंडवणा,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहायाने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरूम मधील कपाटातील रोख ५५ हजार रूपये व सोन्याचे दागिने असा एकुण २,७६,०००/- रू किमतीचा ऐवज दिवसा घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. चव्हाण ९४२२६१५५७५ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडक पो स्टे ५००/१७,भादविक १४३,१४४,१४७,१४८,१४९,३२४,३२३,५०४,५०६(२),महा.पो.का.क.३७(१)१३५ व क्रिमिनल लॉ ॲमेंडमेंट कलम ३,७ |
| **फिर्यादी** | अक्षय पाटोळे,वय-१९ वर्षे,रा.६३३,गंज पेठ,पुणे |
| **आरोपी** | एकुण नऊ इसम (अटक नाही) |

| | |
|---|---|
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२६/१२/२०१७ राजी १३/४५ वा.महाराष्ट्र बेकरी समोर,गंज पेठ,पुणे येथे सार्वजनिक रोड वर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी व नमुद इसम यांची दि.२४/१२/२०१७ रोजी भांडणे झाली होती. त्या भांडणाचा राग मनात धरुन सदर इसमांनी गैर-कायद्याची मंडळी जमवुन फिर्यादी हे त्यांचे वस्तीतील मुलांशी बोलत ऊभे असताना तीन मोटार सायकलवरुन सदर ठिकाणी येवुन, फिर्यादी यांचेकडे हात दाखवुन,“ याने परवा मला मारले आहे,याचा आज गेमच करु” असे म्हणुन त्यांचे कमरेजवळ लपविलेले कोयत्या सारखे हत्यार काढुन फिर्यादी यांचे ऊजवे डोळ्याच्या वर व डावे हाताचे मनगटाजवळ मारुन जखमी केले. त्यावेळी फिर्यादी यांचा मित्र भारत पवार हा मध्ये आला असता त्याचेही ऊजवे हातावर मारुन जखमी केले. त्यावेळी वस्तीतील नागरीक जमा झाल्याने त्यांनी फिर्यादी व भारत पवार यास लाथा-बुक्यांनी मारहाण करुन,त्यांचे हातातील कोयते हवेत फिरवुन,“कोणी पुढे आले तर एकेकाला कापुन टाकु,आम्ही भाईची माणसं आहे,आमच्या नादाला कोणी लागायच नाही” असे धमकावुन जमलेल्या लोकांचे मागे पळु लागल्याने लोक भिती पोटी रस्त्याने सैरावैरा पळु लागले. तसेच हातगाडीवाले आपल्या हातगाड्या सोडुन पळुन गेले. त्याचप्रमाणे आजुबाजुचे दुकानदारांनी त्यांची दुकाने बंद केली. त्यावेळी रस्त्याने जाणा-या येणा-या लोकांना शिवीगाळ करुन हाता तील कोयते दाखवुन,सरद परिसरात दहशत निर्माण करून त्यांचे गाड्यांवरुन पळून गेले. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरि. व्हि.एस्.पवार |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | पिंपरी पो स्टे ७२३/१७,भादविक ४२०,१७७,३४,सह औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा क. १८(ए)(११)१८(सी) सह वाचन कलम १७(ड),२७(ए) प्रमाणे |
| **फिर्यादी** | भार्ग्यश्री यादव,वय-४० वर्षे,रा.सहकारनगर,पुणे |
| **आरोपी** | १.निजामोद्दोन बशीरखान उस्माणी,वय-४० वर्षे,रा.शिवशंकर सोसायटी,पिंपरी,पुणे २.इस्लाम गफुरखान अली सैय्यद,वय-१९ वर्षे,रा.सदर ३.इसाकखाँ शमशुद्दीन तेली,वय-२३ वर्षे,रा.सदर ४.निजाम नुरहसन तेली,वय-२१ वर्षे,रा.सदर |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२५/१२/२०१७ रोजी ११/०० वा. शिवशंकर हौसिंग सोसायटी,पिंपरी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमांनी आपसात संगनमत करुन,कोणत्याही कंपनीच्या शॅम्पुचे उत्पादन व विक्रिचा परवाना नसताना देखील,कंपनीचे बनावट शॅम्पु तयार करुन,ते स्क्रॅप मधुन विकत घेवुन,त्या कंपनीचे शॅम्पुचे रिकाम्या बाटलीत भरुन,सदरच्या बाटल्या ह्या त्याच कंपनीच्या शॅम्पुचे बाटल्या हया बनावट असल्याचे माहीत असुनदेखील,सदर इसमांनी त्याच कंपनीच्या शॅम्पु असल्याचे भासवुन ते तयार करुन,आर्थिक फायद्यासाठी त्याची विक्री करुन,जनतेची फसवणुक केली आहे. तसेच जनतेच्या जीवितास धोका निर्मान करण्याचे इराद्याने विक्री करीता एकुण ०९ विविध कंपनीच्या शॅम्पुच्या बाटल्या ३१ नग असे एकुण १,५३,२१७ /- रू किचे विना परवाना उत्पादीत केलेला माल स्वतः जवळ बाळगला असताना मिळुन आले. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. घुगे ९४०३०३१८८९ |
| **६** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडकी पो स्टे ३००/१७,भादविक ४२०,३७९ |
| **फिर्यादी** | परवेज मण्यार,वय-५४,रा.नाईक चाळ,बोपोडी,पुणे |
| **आरोपी** | एक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१६/१२/१७ रोजी १३/०० वा. छाजेड पेट्रोल पंप बोपोडी,पुणे येथे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांनी olx.com या वेबसाईटवर त्यांची मोटार सायकल विक्रीसाठी जाहिरात दिली होती. त्यावेळी सदर इसमाने फिर्यादी यांचे मुलाशी संपर्क साधुन,त्याचेकडुन ३२,०००/- रुपये किमतीची मोटार सायकलची टेस्ट राईड घेण्याकरीता घेऊन जाऊन,ती मोटार सायकल फिर्यादी यांना परत न करता त्यांची फसवणुक केली आहे. (फिर्यादी यांनी आजु-बाजुच्या परिसरात शोध घेतला होता. परंतु मोटार सायकल मिळुन न आल्याने त्यांनी आज रोजी तक्रार दिली आहे.) |
| **त.अंमलदार** | पो.हवा. ठोकळ ७०४०३९५४७३ |
| **७** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | दिघी पो स्टे २६०/१७,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | सौ.माधवी चव्हाण,वय-३६ वर्षे,रा.बेलवली बदलापुर पश्चिम,जि.ठाणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२६/१२/२०१७ रोजी सकाळी ११/०० ते दुपारी १५/३० वा.चे दरम्यान बदलापुर,ठाणे ते पुणे रेल्वे स्टेशन रेल्वेने व पुणे रेल्वे स्टेशन ते दिघी,पुणे असा पीएमपीएमएल बस प्रवासा दरम्यान |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया बदलापुर(ठाणे) ते पुणे रेल्वे स्टेशन असा भुसावळ पॅसेंजर रेल्वेने व पुणे रेल्वे स्टेशन ते दिघी असा बसने प्रवास करीत असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने,फिर्यादी यांची नजर चुकवुन त्यांचे पर्समध्ये ठेवलेली सोन्याच्या दागिन्याची डब्बी व रोख ३००/- रुपये असा एकुण ३,८६,५५०/- रु किचा ऐवज चोरी करुन नेला आहे. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. पी.ए.कदम ८३०८९९६००७ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**